नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६४ Issue - 64 | वार सोमवार दि. २१ जुलै २०२५ Blow- Monday Date 21 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# कृषीमंत्र्याची हकालपट्टीची मागणी; लातूरमध्ये तुफान राडा, छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण

## तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत गोंधळ; कृषिमंत्र्यांच्या निलंबन करण्याच्या मागणीसाठी आलेल्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानपरिषदेत मोबाईलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ आमदार रोहित पवार यांनी शेअर केल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटना आक्रमक झाली आहे. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी लातूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची पत्रकार परिषद संपताच त्यांना निवेदन दिलं.

माजी मंत्री संजय बनसोडे देखील तिथं उपस्थित होते. यावेळी माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. याच वेळी टेबलवर पत्ते देखील फेकण्यात आले.

यानंतर अखिल भारतीय छावा संघटना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आपापसात भिडल्याचं पाहायला मिळालं.

सुनील तटकरे हे आज लातूर येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्यासाठी आले होते. त्यानंतर पत्रकार परिषदेला ते संबोधित करत होते. पत्रकार परिषद संपल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेचे काही पदाधिकारी त्या ठिकाणी आले. सभागृहात गेम खेळणाऱ्या कृषिमंत्र्यांना पदावर राहण्याचा अधिकार नाही याबाबत



निवेदन अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांना दिलं.निवेदन देत असतानाच त्यांच्यासमोर पत्ते टाकण्यात आले.

गेम खेळायचा असेल तर घरी खेळा... असं सांगत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी केली. सभागृह हे राज्यातील जनतेसाठी कायदा तयार करणारं सभागृह आहे. अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कोकाटेंविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

अखिल भारतीय छावा संघटनेचे कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते भिडले

अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून सुनील तटकरे यांना निवेदन देण्यात आलं. त्यानंतर छावा संघटनेचे कार्यकर्ते बाहेर पडले. ज्या कार्यकर्त्यानं निवेदन दिलं त्याला राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवकच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या विजयकुमार घाडगे पाटील यांना तुफान मारहाण झालेली आहे.

छावाच्या कार्यकर्त्यांना मारहाण करण्यात आली. पोलिसांनी हा वाद सोडवण्याचा प्रयत्न केला मात्र राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना जोरदार मारहाण करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंना माणिकराव कोकाटेंचा राजीनामा मागण्यासाठी गेलो होतो. पत्ते खेळणारे कृषीमंत्री शेतकऱ्यांचं काय भलं करणार आहेत. याबाबत निवेदन दिलं त्यानंतर रेस्ट हाऊसच्या दुसऱ्या खोलीत बसलो होतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे गुंड लोकं आले, त्यांनी आमच्यावर हल्ला केला. सत्तेचा माज काय असतो हे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये पाहायला मिळालं. अजित दादा छावात शेतकऱ्यांची पोरं आहेत, या गोष्टीचा हिशोब होणार असा इशारा विजयकुमार घाडगे पाटील यांनी दिला आहे.

# पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत नागरिकांशी चर्चा करण्यासाठी तीन उपजिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती

**संबंधित नागरिकांनी बैठकामध्ये सक्रिय सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर : पंढरपूर कॉरिडॉर विकासाच्या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या समस्या आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी तसेच शासनाकडून कशा पद्धतीने मदत केली जाणार आहे याची माहिती देण्यासाठी दिनांक २५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बैठका आयोजित केल्या जात आहेत. या बैठका घेण्यासाठी तीन उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सर्व समावेशक चर्चा होण्यासाठी नागरिकांनी सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, भूसंपादन अधिकारी सीमा होळकर व जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे या तीन उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती पंढरपूर कॉरिडॉर अनुषंगाने संबंधित नागरिकांशी सर्व समावेशक चर्चा करून नागरिकांच्या मागण्या सूचना व अपेक्षा यांची माहिती जाणून घेणार आहे तसेच शासन त्यांना या अंतर्गत कशा पद्धतीने मदत करू शकते याविषयी सांगितले जाणार आहे.

संबंधित अधिकारी दररोज २५ ते ३० नागरिकांच्या गटाशी चर्चा करतील. तरी पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत ज्या नागरिक, व्यापारी व व्यावसयिक यांचा संबंध येणार आहे अशा सर्व नागरिकांनी अशा बैठकामध्ये उपस्थित राहून सहकार्य करावे. नियुक्त केलेले अधिकारी हे उपरोक्त कालावधीत पंढरपूर येथे थांबून कामकाज करतील.

पंढरपूर कॉरिडॉरच्या अनुषंगाने दिनांक १ ते ३ मे २०२५ या कालावधीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर येथे सर्व संबंधित नागरिकांच्या बैठका घेऊन चर्चा केलेली होती व त्या चर्चेमध्ये या अनुषंगाने पुढे जाण्यासाठी सर्वांना विचारात घेऊनच जाऊ असा शब्द प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेला होता. त्या पार्श्वभूमीवर दिनांक २५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत नियुक्त केलेले तीन उपजिल्हाधिकारी २५ ते ३० नागरिकांच्या गटाशी चर्चा करणार आहेत. या चर्चेतून सर्वसमावेशक निर्णय घेण्यात येणार आहे. तरी उपरोक्त कालावधीत सर्व संबंधित नागरिकांनी बैठकामध्ये सहभाग घ्यावा असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आवाहन केले आहे.

# कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच; गिरीश महाजनांचा दावा

मुंबई : पुढील वर्षापासून नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी भाजप आग्रही असल्याचे बोलले जात आहे. मंत्री गिरीश महाजन यांची कुंभमेळा मंत्री म्हणून नियुक्ती देखील करण्यात आली आहे. गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली कुंभमेळ्याची तयारी देखील सुरु आहे. तर दुसरीकडे शिंदे गटाचे दादा भुसे हे देखील नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी आग्रही आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून माणिकराव कोकाटे आणि छगन भुजबळ हे देखील पालकमंत्रीपदाच्या रेसमध्ये आहेत. त्यामुळे अद्याप महायुतीत हा तिढा सुटलेला नाही.

नाशिकमध्ये कुंभमेळा असल्याने भरघोस निधी नाशिकसाठी येणार आहे. त्यामुळे नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी महायुतीतील तीनही पक्ष आग्रही असल्याचे बोलले जात आहे. त्यातच आता गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना



नाशिक पालकमंत्रीपदाचा निर्णय लवकरच होईल. मात्र, तो निर्णय काहीही असला तरी कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच आहे, असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आता गिरीश महाजन यांच्या वक्तव्यानंतर शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १८ जानेवारीला पालकमंत्रीपदांची घोषणा केली होती. नाशिक जिल्ह्यासाठी भाजपचे गिरीश महाजन यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. मात्र या नियुक्तीला शिंदे गटाच्या नेत्यांनी विरोध केल्याने अवघ्या एक दिवसातच नाशिकच्या पालकमंत्रिपदाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली होती. आज सहा महिने होऊन देखील नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. नाशिकमधून कोण पालकमंत्री होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असता गिरीश महाजन यांनी मोठा दावा केलाय.

**२४ हजार कोटींचा विकास आराखडा**

दरम्यान, नाशिक महापालिकेने सुमारे १५ हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा सादर केला आहे. तर अन्य नऊ विभागांनी नऊ हजार कोटी असा एकूण २४ हजार कोटींचा विकास आराखडा सादर केला आहे. मात्र, या आराखड्याला अद्याप राज्य सरकारची मंजुरी मिळालेली नाही. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातही या आराखड्यासाठी निधीची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेतला होता. यावेळी सुमारे दोन हजार कोटी रुपयांच्या विकासकामांच्या निविदा काढण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. महापालिकेकडून गोदावरी, वालदेवी आणि नंदिनी या नद्यांवरील पाच पुलांसह इतर काही पुलांच्या कामांसाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. तर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये प्राधिकरण करण्याच्या कायद्याला मंजुरी देण्यात आली होती. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे प्राधिकरणाची सूत्रे सोपवण्यात आली आहे.

**नाशिक कुंभमेळ्याच्या तारखा**

३१ ऑक्टोबर २०२६ पासून कुंभमेळा पर्वाला सुरुवात होणार आहे. या दिवशी ध्वजारोहण शुभारंभ होणार असून

(पान २ वर...)

**राज्यातील ईएसआय हॉस्पिटलसंदर्भात आढावा बैठक**

**दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण**

# कामगार विमा योजनेतील रुग्णालयांबाबत केंद्रीय श्रम व रोजगार मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री डॉ.मनसुख मांडविया यांची शिष्टमंडळासह भेट घेतली. या भेटीत महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली.

राज्यातील कामगार रुग्णालयामध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण असून राज्यातील कामगार रुग्णालयासंबंधीत प्रलंबित प्रश्नांची तातडीने सोडवणूक व्हावी, गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी आवश्यक सोयीसुविधा निर्माण करण्यात याव्यात, अशी मागणी आरोग्यमंत्र्यांनी यावेळी केली. त्यांनी भेटीदरम्यान केंद्रीय श्रम व रोजगार मंत्र्यांचे महाराष्ट्रातील ESIC रुग्णालयांच्या सद्यस्थितीकडे विशेष लक्ष वेधले. केंद्रीय श्रम व रोजगार मंत्र्यांनी लवकरच अंधेरी येथील ESIC रुग्णालयास आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांच्यासमवेत संयुक्त भेट देण्याचे आश्वासन दिले. तसेच, राज्यातील सर्व एडखउ रुग्णालयांबाबत एक सविस्तर आढावा बैठक घेण्याचेही त्यांनी सांगितले.

कर्मचारी विमाधारक (IP) संख्या वाढवण्याबाबत डॉ.मांडविया यांनी सकारात्मकता दर्शवली. यासाठी सध्याची उत्पन्न मर्यादा रू.२१,००० वरून रू.३०,००० पर्यंत वाढवण्यावर सकारात्मक चर्चा झाली. या निर्णयामुळे अधिक कामगार ESIC च्या आरोग्य सुविधांचा लाभ घेऊ शकतील.

कामगार व त्यांचे कुटुंबीयांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी राज्याला अधिक निधी देण्याची विनंती आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी केली. सद्यस्थितीत २१,०००/- हजार रुपये मासिक उत्पन्न असलेल्या कामगारांना विमा योजनेचा लाभ घेता येतो. ही उत्पन्न मर्यादा ३०,०००/- हजार रुपये पर्यंत वाढवण्याची मागणी यावेळी केंद्रीय श्रम व रोजगार मंत्र्यांकडे करण्यात आली. उत्पन्नाची मर्यादा वाढवल्यास विमाधारक कर्मचाऱ्यांची संख्याही वाढेल तसेच अनेक कामगारांना या योजनेचा लाभ घेता येईल.

राज्यात कामगार विमा सोसायटीची पंधरा रुग्णालये असुन योजनेची संलग्नित असलेल्या ४५० खाजगी रुग्णालये व १३४ सेवा दवाखान्याच्या माध्यमातून कामगार व सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्य



सेवा उपलब्ध करून दिली जाते. राज्यात सद्यस्थितीत ४८ लाख ७० हजार ४६० विमाधारक कामगार असुन, कामगार व त्यांचे कुटुंबीय मिळून सुमारे दोन कोटी नागरिक विमा योजनेचा लाभ घेतात. केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री यांच्या भेटीत उल्हासनगर, अंधेरी, कोल्हापूर येथील बांधकामांची सद्यस्थिती, विविध ठिकाणी सुरू असलेल्या रुग्णसेवा बाबतची चर्चा झाली.

अंधेरी, कोल्हापूर आणि उल्हासनगर येथील ESIC रुग्णालयांची प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करून ती कार्यान्वित करण्यासाठी ESIC महासंचालकांना सूचना देण्यात येतील, असेही डॉ. मांडविया यांनी स्पष्ट केले. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथील एडखउ रुग्णालयाची श्रेणीवाढ करण्याबाबतही विचार केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

केंद्रीय मंत्री श्री.मनसुख मांडविया यांनी सर्व प्रश्नांच्या सोडवणुकी बाबतीत सकारात्मक चर्चा केली. तसेच राज्याचे आरोग्य मंत्री यांच्या समवेत मुंबईतील अंधेरी येथील ESIC रुग्णालयास संयुक्त भेट देऊन पाहणी करणार असल्याचे सांगितले आहे. राज्यातील सर्व ESIC रुग्णालयांबाबत एक सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या, असेही केंद्रीय मंत्र्यांनी नमूद केले.

या भेटीमुळे महाराष्ट्रातील एडखउ आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणाला गती मिळेल आणि विमाधारक कर्मचाऱ्यांसाठी उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असे आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी या भेटीबाबत सांगितले. या भेटीच्या वेळी आरोग्य सचिव वीरेंद्र सिंग, एडखड चे आयुक्त रमेश चव्हाण व इतर अधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय....

### राडा

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानपरिषदेत मोबाईलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ आमदार रोहित पवार यांनी शेअर केल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटना आक्रमक झाली आहे. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी लातूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची पत्रकार परिषद संपताच त्यांना निवेदन दिलं. यावेळी माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. याच वेळी टेबलवर पत्ते देखील फेकण्यात आले. यानंतर अखिल भारतीय छावा संघटना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आपापसात भिडल्याचं पाहायला मिळालं. सुनील तटकरे हे लातूर येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्यासाठी आले होते. त्यानंतर पत्रकार परिषदेला ते संबोधित करत होते. पत्रकार परिषद संपल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेचे काही पदाधिकारी त्या ठिकाणी आले. सभागृहात गेम खेळणाऱ्या कृषिमंत्र्यांना पदावर राहण्याचा अधिकार नाही याबाबत निवेदन अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांना दिलं.निवेदन देत असतानाच त्यांच्यासमोर पत्ते टाकण्यात आले. गेम खेळायचा असेल तर घरी खेळा... असं सांगत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी केली. सभागृह हे राज्यातील जनतेसाठी कायदा तयार करणारं सभागृह आहे. अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कोकाटेंविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून सुनील तटकरे यांना निवेदन देण्यात आलं. त्यानंतर छावा संघटनेचे कार्यकर्ते बाहेर पडले. ज्या कार्यकर्त्यानं निवेदन दिलं त्याला राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवकच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या विजयकुमार घाडगे पाटील यांना तुफान मारहाण झालेली आहे. यावरून राज्यभरात पडसाद उमटले आहे.

## कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच; गिरीश महाजनांचा दावा

(पान १ वरून...)

दुपारी १२ वाजता राम कुंडावर हा सोहळा पार पडेल. तर साधुग्राममध्ये २४ जुलै २०२७ रोजी आखाडा ध्वजारोहण होईल. तर २४ जुलै २०२८ रोजीपर्यंत कुंभमेळा पूर्व सुरू राहणार आहे. तर सिंहस्थ कुंभमेळ्यातील अमृत स्नानाच्या संभाव्य तारखा सुद्धा जाहीर करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, २ ऑगस्ट २०२७ रोजी पहिले शाही स्नान होणार आहे. २९ जुलै २०२७ रोजी नगर प्रदक्षिणा होणार आहे. तर पहिले अमृतस्नान हे सोमवारी, २ ऑगस्ट २०२७ रोजी पहिले शाही स्नान होणार आहे. तर दुसरे अमृतस्नान ३१ ऑगस्ट २०२७ रोजी होणार आहे. तर तिसरे आणि शेवटचे अमृतस्नान हे ११ सप्टेंबर २०२७ रोजी नाशिक येथे होईल. तर २४ जुलै २०२८ रोजी सिंहस्थ मेळाचा ध्वज हा खाली उतरवण्यात येईल. या दिवशीपर्यंत कुंभमेळा सुरू राहील.

### आधुनिक पत्रकारिता : आव्हाने आणि संधी या विषयावर कार्यशाळेत मंथन

# निष्पक्ष पत्रकारिता काळाची गरज : कारंडे

## सत्य मांडणारी निर्भीड पत्रकारिता हवी : कुलगुरू डॉ. महानवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : काळानुसार पत्रकारितेत बदल होत आहेत. तांत्रिकसह कंटेंट बदलत आहे. माहितीचा भडीमार होत आहे. यामध्ये निष्पक्ष पत्रकारिता ही काळाची गरज आहे. पत्रकार म्हणून अचूक माहिती पोहोचवणे महत्त्वाचे आहे. पत्रकारितेला संघर्ष नवा नाही. नवी आव्हाने पत्रकार पेलतील, असा विश्वास इंडिया टुडे मुंबईचे वरिष्ठ पत्रकार अभिजीत कारंडे यांनी व्यक्त केला.




पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सामाजिक शास्त्रीय संकुल, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन वरिष्ठ पत्रकार अभिजीत कारंडे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी विचारमंचावर दैनिक दिव्य मराठीचे निवासी संपादक महेश रामदासी, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दैनिक पुण्यनगरीचे वृत्तसंपादक रघुवीर शिराळकर, दैनिक सुराज्यचे वृत्तसंपादक पुरुषोत्तम कुलकर्णी, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे, जनसंज्ञापन विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

वरिष्ठ पत्रकार अभिजीत कारंडे पुढे म्हणाले, गेल्या वीस वर्षात पत्रकारिता क्षेत्र वेगाने बदलत आहे. या बदलानुसार पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात विद्यापीठांनी बदल करणे गरजेचे आहे. पत्रकार म्हणून अचूक माहिती लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. वृत्तपत्रातील माहिती बिनचूक आहे का हे महत्त्वाचे ठरते. पत्रकारितेतील आव्हाने याची काळजी करण्यापेक्षा सक्रियपणे काम केले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ताने अनेक गोष्टी सुकर केल्या आहेत. तंत्र व कंटेंट हे मोठे आव्हान आहे. माहितीचा वर्षाव सर्वत्र होत असताना प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पत्रकारिता करण्याची आज आवश्यकता आहे. घटनास्थळावर गेल्यास तेथील घटनेची संवेदनशीलता आणि इतर कंगोरे मिळतात. या दृष्टिकोनातून निष्पक्षपणे पत्रकारिता करणे ही कसरत आहे मात्र ते करणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले, प्रथम बातमी देण्याच्या स्पर्धेत चुकीचा संदेश जाऊ नये. घाई न करता योग्य तीच बातमी लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे. सुदृढ पत्रकारितेला गालबोट लागू नये याची काळजी घेणे आता गरजेचे आहे. परिणामी समाजाचा विश्वास कमी होऊ शकतो. तंत्रज्ञानाचा वापर म्हणावा तितका या क्षेत्रात होत नाही. माहितीची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे संधी आणि आव्हानही आहे. सोशल मीडियामुळे चुकीच्या बातम्याही येतात. अशा बातम्यांमुळे समाजात संवेदनशीलता निर्माण होते. सत्य मांडणारी निर्भीड पत्रकारिता आज गरजेची आहे, असे ते म्हणाले.

संपादक महेश रामदासी म्हणाले, पत्रकारांसमोर कुठलेही आव्हान नसावे. आधुनिक पत्रकारितेमध्ये एआय संधी म्हणूनच स्वीकारले पाहिजे. सोशल मीडिया जसा शिकला तसे एआय स्वीकारले पाहिजे. थेट घटनास्थळावरची पत्रकारिता महत्त्वाची आहे. पत्रकारितेत विश्वासाहर्ता जपली पाहिजे. हेच खरे आव्हान आहे. रोखठोक प्रश्न विचारणारे पत्रकार कमी आहेत. बटीक म्हणून न राहता माध्यमांची प्रतिष्ठा जपणे गरजेचे आहे.

संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे म्हणाले, पत्रकारिता क्षेत्रात नवे बदल होत आहेत. पत्रकारितेमध्ये सध्या विश्वास टिकवणे आवश्यक आहे. तटस्थ पत्रकारिता सध्या राहिली नाही. त्या अनुषंगाने आता पत्रकारिता होणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. यावेळी डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी विद्यापीठातील जन संज्ञापन विभागातील विविध कोर्स आणि अभ्यासक्रमाची माहिती दिली.

प्रारंभी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आणि पत्रमहर्षी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी या कार्यशाळेमागचा उद्देश प्रास्ताविकेत स्पष्ट केला. सहाय्यक प्रा. डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले तर सहाय्यक प्रा. डॉ. अंबादास भासके यांनी आभार मानले. यावेळी श्रमिक पत्रकार संघाचे सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे यांच्यासह शहर - जिल्ह्यातून विविध माध्यमांचे पत्रकार, प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आधुनिक पत्रकारितेमध्ये अनेक संधी उपलब्ध : पाटील**

**समारोप सत्रात विविध विषयावर मंथन**

आधुनिक पत्रकारितेमध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत. पत्रकारांनी सामाजिक भान जपले पाहिजे. त्याचबरोबर सामाजिक जनजागृतीसाठी परखड आणि धाडसी मत व्यक्त केले पाहिजे , असे विचार साहित्य चपराक पुणेचे संपादक घनश्याम पाटील यांनी व्यक्त केले

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सामाजिक शास्त्रीय संकुल, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक पत्रकारिता : आव्हाने आणि संधी या विषयावरील कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा होते. यावेळी विचार मंचावर प्रमुख माहिती उपसंचालक डॉ. किरण मोघे, केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दैनिक सकाळचे सहयोगी संपादक सिद्धाराम पाटील, अपूर्वाई मल्टीमीडियाचे संपादक डॉ. रवींद्र चिंचोळकर,महाराष्ट्र राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे, जनसज्ञापन विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. मोघे यांनी आपल्या भाषणात पत्रकारांसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या असलेल्या योजनांची माहिती दिली.आधुनिक पत्रकारितेच्या अनेक संधी उपलब्ध आहेत नाविन्यता अधिक प्रभावी करण्यासाठी तंत्रज्ञान उपयोगी पडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सहयोगी संपादक सिद्धाराम पाटील यांनी पत्रकारितेतील बदल आणि संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. पत्रकारांनी वाचन संस्कृती जपली पाहिजे. उत्तम संवादासाठी नवनवे तंत्रज्ञानही आत्मसात केले पाहिजे. असे ते म्हणाले

शेवटी मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंबादास भासके यांनी केले तर श्रमिक पत्रकार संघाचे सरचिटणीस सागर सुरवसे यांनी आभार मानले.

## अरण येथील कार्तिकचा मृतदेह आढळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : माढा तालुक्यातील अरण येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. कार्तिक खंडागळे नावाच्या दहा वर्षांच्या मुलाचा मृतदेह एका कोरड्या कॅनलमध्ये सापडला.

कार्तिक चार दिवसांपासून बेपत्ता होता. तो गावातील मैदानावर खेळत असताना अचानक गायब झाला होता. पोलिसांनी त्याचा शोध घेतला, पण तो सापडत नव्हता. अखेर शनिवारी त्याचा मृतदेह कॅनलमध्ये आढळला.

कार्तिकची हत्या झाली असावी, असा संशय आहे. त्याचे कुटुंबीय न्यायाची मागणी करत आहेत. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण असून कार्तिकचा नरबळी तर दिला नाही ना, अशी चर्चा सुरू आहे.





शनिवारी सकाळी तुळशी मोडलिंब रस्त्यावर जाधव वाडीजवळ सीना माढा उपसा सिंचनच्या कोरड्या कालव्यात कार्तिकचा मृतदेह सापडला. पोलिसांनी सांगितले की, कार्तिकची हत्या इतरत्र कोठे तरी करून त्याचा मृतदेह कालव्यात आणून टाकला असावा. मृतदेह चार दिवसांपूर्वीचा असल्याने तो कुजलेल्या अवस्थेत होता. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली होती.

## श्री वसंतराव देशमुख यांचा कासेगाव ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील वसंतराव देशमुख यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कासेगाव ग्रामपंचायत च्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला प्रमुख पाहुणे म्हणून माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैरशील मोहिते पाटील उपस्थित होते यावेळी कासेगाव ग्रामपंचायत च्या वतीने प्रत्येक घरात कलमी आंब्याची आंब्याची एक झाड व दोन कचराकुंडी तसेच गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले.

यावेळी उद्योग व व्यापार चे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, पंढरपूर मंगळवेढा राष्ट्रवादीचे नेते अनिल (दादा )सावंत, अमर पाटील डीव्हीपी उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक, दीपक वाडदेकर, सुरेश कट्टे ,आबासाहेब देशमुख, भारत भुसे, माऊली कोंडबारी, सारंग जाधव, सरपंच शोभा भोसले, उपसरपंच संग्राम देशमुख, चंद्रकांत देशमुख, शिवपुरी ,वंदना जगताप, तसेच पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील राष्ट्रवादीचे पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व काशिगाव मधील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे जलसंपदा (विदर्भ तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने नित्यपूजा विभागप्रमुख संजय कोकीळ यांच्या हस्ते जलसंपदा मंत्री श्री महाजन यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे कर्मचारी तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## ठाकरे बंधुंप्रमाणेच राजकारणात ठाकरे आणि शिंदेंचही मनोमिलन होणार, शिवसेनेच्या मंत्र्याचं मोठं भाकीत

मुंबई : पाच जुलैल्या झालेल्या विजयी मेळाव्यात दोन्ही ठाकरे बंधू तब्बल २० वर्षांनी एकाच व्यासपीठावर आलेले पाहायला मिळाले. याचनिमित्ताने आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीच्या चर्चांना बळ मिळाले आहे. परंतु युतीच्या निर्णयावर अद्याप शिक्कामोर्तब झालेला नाही. यातच शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठं विधान केलं आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंचंही मनोमिलन होऊ शकतं, असे सरनाईक म्हणाले आहेत.



एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर शिवसेनेत फूट पडली. दोन्ही गटातील नेत्यांकडून एकमेकांवर आरोपास्त्र डागले जात आहेत. तसेच नेत्यांमध्येही एकमेकांबाबत राजकीय वैर आहे. यामुळे दोन्ही शिवसेना एकत्र येण्याची शक्यता मावळत असतानाच प्रताप सरनाईकांनी मोठं वक्तव्य केलं आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे जसे एकत्र आले तसे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेही एकत्र येऊ शकतात, असे सरनाईकांनी म्हटले आहे. यामुळे राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान गेल्या काही दिवसांपासून आमदारांचे वादग्रस्त व्हिडीओ समोर आले असून अधिवेशनातही हे मुद्दे गाजले आहेत. यावर देखील प्रताप सरनाईक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमच्या पक्षातील आमदारांकडून काही विधानं करण्यात आले, त्यामुळे एकनाथ शिंदे नाराज होते, शिंदेंनी आमदारांना सक्त सूचना देखील दिल्या आहेत. आमच्याच आमदारांच्या तक्रारी आहेत असं नाही, सगळ्याच पक्षातील आमदार बोलतात, असे सरनाईकांनी नमूद केले.

उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेवर मोठा आरोप केला होता. जादूटोणा करून आमदार निवडून आले, असा दावा ठाकरेंन केली. यावर प्रतिक्रिया देताना सरनाईक म्हणाले, तुमचे आमदार निवडून आले हे काय जादूटोणा न करता आले? आणि आमचे जादूटोणा करून आले का? तुमचे लोकसभेला खासदार जादूटोणा करूनच निवडून आले होते का? असा सवाल सरनाईक यांनी यावेळी केला. एकनाथ शिंदे शिवसेनेचे ब्रँड आहेत. आमच्या पक्षाचा ब्रँड म्हणजे एकनाथ शिंदे, असंही यावेळी सरनाईक यांनी म्हटलं आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# संत नामदेव महाराज ६७५ वा संजीवन समाधी सोहळा

## श्रीक्षेत्र पंढरीत दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन : महेश ढवळे; मुख्यमंत्री फंडणवीसांसह अनेक मंत्री, महाराज मंडळीची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भागवत धर्मचे प्रसारक, आद्य किर्तनकार, श्री विठ्ठलाचे लडिवाळ भक्त संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठशतकोत्तर (६७५ वा) संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे बुधवार दि. २३ व गुरुवार दि. २४ जुलै रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मंत्री, खासदार-आमदार, महाराज मंडळी तसेच मान्यवर मंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे संस्थापक अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिली.

श्रीसंत शिरोमणी नामदेव महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त माहिती देण्यासाठी पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी एकसंघाचे राष्ट्रीय सचिव व केशवराज संस्थेचे प्रमुख रुपेश खांडके, एकसंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष नंदकुमार कोसबतवार, धनंजय गोंदकर,प्रदेशाध्यक्ष व संत




नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे, पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष प्रथमेश परांडकर, वैभव सद-ावर्ते, प्रभु सोनवणे आदी उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित पत्रकारांचे स्वागत पत्रकार प्रशांत माळवदे यांनी केले. तर सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन पंढरपूर शिंपी समाजाचे विश्वस्त राजेश धोकटे यांनी केले.

यावेळी माहिती देताना महेश ढवळे म्हणाले, संत नामदेव महाराज व परिवाराच्या षष्ठशतकोत्तर (६७५ वा) संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, श्री केशवराज संस्था पंढरपूर, संत नामदेव महाराज भक्त परिवार, नामदास महाराज परिवार, संत नामदेव शिंपी समाज पंढरपूर यांच्यावतीने श्रीक्षेत्र पंढरपूर येथे बुधवार दि. २३ व गुरुवार दि. २४ जुलै रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रमुख उपस्थित राहणार असून त्यांच्या समवेत पालक मंत्री जयकुमार गोरे, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिणीनाथ महाराज औसेकर, भाजपा अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले, माजी आ. प्रशांत परिचारक, अभिनेते गोविंद नामदेव, अनेक मंत्री, खासदार, आमदार, महाराज मंडळी उपस्थित राहणार आहेत.

### संत नामदेव स्मारकाचे काम लवकरच सुरु होणार

**श्रीक्षेत्र पंढरी नगरीत चंद्रभागा नदीच्या पलीकडे भक्तीसागर येथे संत नामदेव महाराजांचे राष्ट्रीय स्मारक उभारणीसाठी राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. यासाठी रेल्वे विभागाची जागा राज्य शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आली असून सुमारे १० एकर जागेवर स्मारक उभारण्यात येणार आहे. अंतिम आराखडा तयार करण्यात आला असून स्मारकाचे काम लवकरच सुरु करण्याातत येणार असल्याचे महेश ढवळे यांनी यावेळी बोलताना सांगितले.**

संजीवन समाधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असलेल्या संत नामदेव मंदिर येथे पौर्णिमेपासून धार्मिक कार्यक्रम व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे. प्रमुख कार्यक्रमाच्या अंतर्गत सोमवार दि. २१ रोजी एकादशीनिमित्त दिंडीची नगर प्रदक्षिणा होणार आहे. मंगळवार दि. २२ रोजी द्वादशी दिवशी क्षीरापत कार्यक्रम होणार आहे. बुधवार दि. २३ जुलै रोजी मुख्य दिवशी सकाळी ९ ते १२ या वेळेत संत नामदेव मंदिर येथे ह.भ.प. नामदास महाराज यांचे संत नामदेव महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यावर आधारित किर्तन होणार आहे. त्यानंतर गुलाल पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. तसेच संत नामदेव मंदिर, संत नामदेव पायरी व श्री विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दर्शन घेणार आहे. तसेच मानकर्यांच्या हस्ते महानैवेद्य दाखविण्यात येणार आहे. त्यानंतर एल.आय.सी. कार्यालयासमोरील आरती मंडप मनमाडकर हॉल येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. नामदास महाराज कुटुंबातील ५ महाराजांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते संत पूजन होणार आहे. यावेळी मान्यवर मंत्री, महाराज मंडळी उप-स्थित राहणार आहेत. कार्यक्रमानंतर संत नामदेव मंदिर येथे सर्वांना मुक्तद्वार महाप्रसाद देण्यात येणार आहे.

तसेच दि. २३ व दि. २४ जुलै असे २ दिवस दिवसभर शिंपी समाजा-तील बांधवांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. २४ जुलै रोजी सकाळी १० ते १२ वाजता ह.भ.प. नामदास महाराजांचे काल्याचे किर्तन होईल. सायंकाळी ६ वाजता शाही दिंडी लवाजम्यासह संत नामदेव महाराजांच्या पालखीची नगर प्रदक्षिणा होणार आहे. वरील सर्व कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातून शिंपी समाज बांधव, संत नामदेव भक्त मंडळी, महाराज मंडळी उपस्थित रा-हणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष गणेश उंडाळे यांनी सांगितले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समस्त नामदास महाराज परिवार व नामदेव महाराज फड श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, श्री. केशवराज संस्था पंढरपूर, संत नामदेव शिंपी समाज पंढरपूर, युवक संघटना, संत नामदेव महिला भजनी मंडळ परिश्रम घेत आहेत. सदर पत्रकार परिषदेस पत्रकार बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मनमाडकर हॉल येथे कार्यक्रम

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संत नामदेव पायरी, महाद्वार येथे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार होता. मात्र त्याठिकाणी होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता सदरचा कार्यक्रम एल.आय.सी. कार्यालयासमोरील आरती मंडप मनमाडकर हॉल येथे होणार आहे. याठिकाणी संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. नामदास महाराज कुटुंबातील ५ महाराजांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते संत पूजन होणार आहे. यावेळी मान्यवर मंत्री, महाराज मंडळी उपस्थित राहणार आहेत.**

---

## येडोळा येथे वर्षावास निमित्ताने बुद्ध वंदना व धम्मदेशना कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : धाराशिव जिल्ह्यातील मौजे येडोळा ता.तुळजापूर येथे वर्षावास निमित्ताने सामुदायिकरित्या बुद्ध वंदना व धम्म देशना कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न.

आषाढी पोर्णिमा ते आश्विनी पोर्णिमा हा तिन महिन्याचा पावसाळी काळ बौद्ध धम्मात वर्षावास म्हणून (वर्षा म्हणजे पाऊस,वास निवास किंवा मुक्काम ) पाळला जातो. या काळात बौद्ध बांधवांच्या वतीने धम्म प्रसार आणि प्रचाराच्या दृष्टीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते,त्याचाच भाग म्हणून भारातिय बौद्ध महासभा जिल्हा शाखा धाराशिव आणि न्यू सिद्धार्थ बुद्ध विहार कमिटी व न्यू सिध्दार्थ कला व क्रिडा मंडळ येडोळ ता.तुळजापूर च्या वतिने येथिल भिमनगर येथे सामुदायिक रित्या बुद्ध वंदना व धम्मदेशना (प्रवचन) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतिय बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्षा राजश्री कदम ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे जेष्ठ कार्यकर्ते विश्वास भाऊ पांडागळे, तुळजापूर तालुका सरचिटणीस राकेश जेटीथोर आदी होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथ-ागत भगवान गौतम बुध्द व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेण्यात आली.यावेळी बोलतान राजश्री कदम म्हणाल्या की बौद्ध धम्म हा मानव-ाला मानवतेची शिकवन देणारा धम्म असून मानवाला आनंददायी जीवन जगण्याचा मार्ग दाखवितो तेंव्हा तथागत भगवन गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून ते अचरनात अनावे.या प्रसंगी विश्वास भाऊ पांडागळे, राकेश जेटीथोर यांचे ही भाषणे झाली.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन अमर जेटीथोर यानी केले.यावेळी देवानंद लोंढे, सुरेश लोंढे, भानुदास लोंढे , अंकुश लोंढे, प्रवीण कांबळे, गौरव लोंढे, सुरज लोंढे, अभिषेक लोंढे, गोवर्धन लोंढे, मारुती लोंढे, सुमित लोंढे, अमित लोंढे, सुवर्णा लोंढे, रागिणी लोंढे सुनिता लोंढे, विशाल लोंढे, सविता लोंढे, माधवी लोंढे, कान्होपात्रा साळूबाई लोंढे, रतन लोंढे, स्नेहा लोंढे, आकांक्षा लोंढे नागेश लोंढे, उषा लोंढे, शितल लोंढे, सृष्टी लोंढे, सारिका लोंढे, रेखा लोंढे सह कार्यकर्ते उपस्थित होते.

## मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील प्रमुख मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक दिनांक २० जुलै रविवार रोजी सकाळी साडेअकरा वाजता मंगळवेढा शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे. मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, समन्वयक नारायण गोवे, उपजिल्हाध्यक्ष चंद्रकांत पवार, पंढरपूर तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, मंगळवेढा तालुका अध्यक्ष धनाजी गडदे, सांगोला तालुका अध्यक्ष अनिल केदार , विधानसभा अध्यक्ष अनिल बागल, शहराध्यक्ष संतोष कवडे, संघटक गणेश पिंपळ-नेर, विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष अवधूत गडकरी, उपशहर अध्यक्ष प्रदीप प्रचंडे, उप तालुका अध्यक्ष कृष्णा ताड , इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

यावेळी मंगळवेढा तालुक्यातील विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी नवनिर्माण सेनेत प्रवेश केला आहे.

## श्री सरस्वती हायस्कूल टाकळीवाडी येथे एचपीव्ही लसीकरण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे शनिवार, दि. १९ जुलै २०२५ रोजी श्री बाहुबली विद्यापीठ बाहुबली संचलित, श्री सरस्वती हायस्कूल टाकळीवाडी येथे शालेय विद्यार्थिनींना एचपीव्ही लस देण्यात आली आहे. विद्यार्थिनींना गर्भाशयाचे आजार होऊ नयेत यासाठी सदर लस देण्यात आली. यावेळी डॉ. भूषणकुमार एमाटे, शालेय समितीचे चेअरमन श्री जितेंद्र कोथळी, सदस्य श्री खुशाल कांबळे उपस्थित होते.

लसीकरण कार्यक्रमाचे उद्धाटन मुख्याध्यापक श्री संजय तपासे यांच्या हस्ते झाले.

प्राथमिक आरोग्य केंद्र टाकळी यांच्यामार्फत हा लसीकरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ३० विद्यार्थिनींना लस देण्यात आली. याप्रसंगी शुभांगी मोहिते, लता सहारे, दिलीप आठपाळे, आशा स्वयंसेविका व विद्यालयाचा सर्व स्टाफ उपस्थित होता.

## डुबेरे जनता विद्यालयात पालक-शिक्षक व माता-पालक संघाची स्थापना




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित डुबेरे येथील जनता माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात पालक -शिक्षक संघ व माता- पालक संघाची स्था-पना करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे होते. व्यासपीठावर उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने ,अरुण वारुंगसे,भाऊ वारुंगसे ,अर्चना ढोली, सोमनाथ वारुंगसे,रामदास वारुंगसे ,सोमनाथ पगार आदी उपस्थित होते.

पालक-शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले ,उपाध्यक्षपदी नामदेव पावसे, सचिवपदी उपशिक्षक कचेश्वर शिंदे,सहसचिव समीर सय्यद यांची तर माता पालक संघाच्याउपाध्यक्षा- अश्विनी हिरे,सचिव सुनिता ढोली,सहसचिव- गायत्री वारुंगसे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

तसेच विशाखा समिती व सखी सावित्री समितीच्या पदाधिकारी व सदस्य यांची निवड करण्यात आली. यावेळी अर्चना ढोली, मंजुषा पडवळ,माणिक वारुंगसे, गणेश वारुंगसे, संदीप पावसे ,संतोष वाजे ,देविदास सुर्यवंशी आद-ींनी विचारलेल्या प्रश्नांना व झालेल्या चर्चेला मुख्याध्यापक रंगनाथ उगले यांनी समर्पक उत्तरे दिली. या उत्तरांनी उपस्थित पालकांनी समाधान व्यक्त केले . यावेळी बोलताना श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे व्हा.चेअरमन अरुण वारुंगसे म्हणाले की,शाळेच्या प्रगतीसाठी पालक व शिक्षकांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांची जबाबदारी सुद्धा महत्त्वाची आहे. आईने मुलींवर चांगले संस्कार करून मुलींची जबाबदारी घेतली पाहिजे. कोणत्याही पालकांनी विद्यार्थ्यांना मोबाईल देऊ नये असे आवाहन वारुंगसे यांनी केले.

शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या शिस्त, गुणवत्तावाढीसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार आहे. निवड झालेल्या सर्व सदस्य व उपाध्यक्ष यांचे अभिनंदन करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा विद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. वाढदिवसानिमित्त मुख्याध्यापक उगले यांचा , विद्यालयाचे उपशिक्षक पी. आर. करपे यांना त्रिरशमी फेलोशिप मिळाल्याबद्दल तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्ती लाभ मिळाल्याबद्दल गौरी वाजे व आरोही जाधव तसेच मार्गदर्शक शिक्षक या सर्वांचा ग्रामस्थामार्फत सत्कार करण्यात आला . सर्व ग्रामस्थांनी शाळेतील उल्लेखनीय बाबींचे, विविध उपक्रमांचे व शाळेतील शिक्षकांचे कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे म्हणाले की, शाळेला येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी पालकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे .

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी सर्वांनी मिळून सामूहिक प्रयत्न करावे. निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी शाळेला वेळ देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हातभार लावावा. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे उज्ज्वल यश असे आव्हान वाजे यांनी केले.

प्रास्तविक विद्यालयाचे पर्यवेक्षक उल्हास पवार यांनी केले. जेष्ठ शिक्षक पी.आर. करपे यांनी विद्यालयातील विविध उल्लेखनीय उपक्रमांची माहिती पालकांना देवून सूत्रसंचालन केले तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.

---

**हरित धाराशिव आभियान - २०२५**

**गुजनूर येथे डॉ.खजुरे यांचे प्रतिपादन**

## वृक्षारोपण व वृक्ष संगोपन ही काळाची गरज







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस. के.गायकवाड) : वृक्षारोपन आभियान ही सतत चालण-ारी प्रक्रिया असून पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने वृक्षारोपना बरोबरचं वृक्ष संगोपन करणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.सिद्रामाप्पा खजुरे (खुदावाडी) यानी गुजनूर ता.तुळाजापूर येथे बोलताना केले.

हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र, एक पेड माँ के नाम या शासनाच्या आभियाना अंतर्गत धाराशीव जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या हरित धाराशिव आभियान - २०२५ च्या वतीने गुजनूर ता.तुळजापूर येथे शासकीय गावठान जमिनीवर वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे आयोगजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ.खजुरे उदघाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गुजनूरचे विद्यामान सरपंच फूलचंद वाघमारे हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून शहापूरचे सरपंच उमेश गोरे, उपसरपंच नानासाहेब पाटील, गुजनूर चे उपसरपंच,व्यकटसाळूंके,तंटा मुक्त अध्यक्ष साहेबराव साळूंके, शहपूर तंटामुक्त अध्यक्ष तुकाराम जाधव, सामाजिक कार्यकर्ते भास्कर सुरवसे,डॉ.यशवंत नरवडे, उप कृषी अधिकार डी.पी.बिराजदा,आदी उपस्थित होते.

या उपक्रमामध्ये जिल्हा प्रशासना-तील महसुल,कृषी,बांधकाम, शैक्षणिक सह सर्व विभागातील अधिकारी,कर्मचारी गुजनूर,शहापूर, गुळहळ्ळी आदी गावातील अशा कार्यकर्त्या, अंगणवाडी कार्यकर्त्या, उमेदच्या सिआरपी,महिला,युवा कार्यकर्ते, शहापूर, गुजनूर येथिल जि.प. प्राथमिक शाळ, छत्रपती शिवाज विद्यालय शह-ापूर आदी गावातील शालेय विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक.ग्रामस्थानी सहभाग नोंदविला होता.

प्रारंभी विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी येथील शासकीय गायरान जमिनीवर विविध प्रकारची तिन हजार व्रक्षाच्या रोपांचे वृक्षारोपन करण्याचे नियोजन करण्यात आले होते. या प्रसंगी,ग्राम महसुल अधिकारीआर.बी.पाटील मॅडम, सहाय्यक कृषी अधिकारी यू. टी. कर्ले मॅडम,मंडळ कृषी अधिकारी सत्यजीत देशमुख, बांधकाम शाखाआभियंता जी.टी.घाटे, ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कुंभार, जी.आर.जमादार,पोखरा अभियानाचे स्वयंमसेवक जितेंद्र माने,श्रीमंत सुरवसे, हरीष सुरवसे,आरविंद जगताप,सामाजिक कार्यकर्ते जयभीम वाघमारे,अक्षय सुरवसे, मोहन व्हंताळे,किशोर वाघमारे,सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# राज्याच्या सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा मुबलक वीज उपलब्ध होणार : मंत्री छगन भुजबळ

## माणुसकी फाउंडेशन व ग्रो केअर कृषी मंचाच्या वतीने मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्काराचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने राज्य शासनाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत आहे. विशेषतः शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज ही अतिशय महत्वाची असल्याने दिवसा मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी सौर कृषि पंप योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची अतिशय यशस्वीपणे राबविण्यात येत असून लवकरच शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध होईल असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

माणुसकी फाउंडेशन आणि ग्रो केअर कृषी मंचाच्या वतीने आयोजित कृषी पुरस्कार कार्यक्रम नक्षत्र हॉल निफाड येथे पार पडला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, शिवाजीराव ढेपले,राजाभाऊ शेलार, प्रांत अधिकारी शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, भाऊसाहेब बोचरे, विनोद जोशी, बाळासाहेब पुंड, दत्ताकाका रायते, अशोक नागरे, सुरेखा नागरे, सुवर्णा पगार, सुमनताई शेलार, पांडुरंग राऊत, राहुल डुंबरे, ग्रो केअर कृषी मंचचे अध्यक्ष भूषण निकम, माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष सागर निकाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कृषि क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांच्या स्मृतीस अभिवादन करत मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, येवला, निफाडसह परिसरात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादक शेतकरी आहे. यामध्ये लासलगाव येथे आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ आहे. मात्र अनेकदा कांद्याला भाव न मिळाल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत येतात. त्यामुळे कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना देऊन शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य भाव मिळण्यासाठी येवला तालुक्यातील चिचोंडी औद्योगिक वसाहतीत ५० एकर जागा कांदा उद्योगासाठी आरक्षित करण्यात आली असून लवकरच हा प्रकल्प सुरू होईल अशी माहिती त्यांनी दिली.




ते म्हणाले की, कृषिप्रधान देशाची खरी ताकद हा शेतकरी बांधव आहे. आपण सर्वजण जाणतो की, भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्या देशात अजूनही बहुतांश लोकांचे जीवन शेतीवर आधारित आहे. शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. बदलत्या हवामानाचा फटका, बाजारातील अस्थिरता, योग्य दर न मिळणे यामुळे शतकरी वर्ग अडचणीत आहे. अशा कठीण परिस्थितीत ग्रोकेअर कृषी मंच सारखी संस्था शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जाते. ही कौतुकास्पद बाब आहे.

ते म्हणाले की संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेतीचं प्रशिक्षण, सेंद्रिय शेतीचं प्रोत्साहन, मार्गदर्शन, तालुका व जिल्हास्तरीय प्रेरणादायक शेतकऱ्यांचा सन्मान, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण, गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, महिलांसाठी प्रशिक्षण असे विविध कार्यक्षेत्र हाताळणं ही खरोखरच विलक्षण गोष्ट आहे. त्याचबरोबर पत्रकार सागर निकाळे यांच्या माणुसकी फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम नियमित राबविले जात आहे. या संस्थेचे काम देखील कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजीराव ढेपले, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, ग्रो केअर कृषी मंचचे अध्यक्ष भूषण निकम, माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष सागर निकाळे यांच्यासह मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

---

## रस्त्यावर टाकण्यात आलेल्या रॅबिटने भरलेल्या गोण्यांचा नागरिकांना त्रास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : अमृत नगर ओएनजीसी कॉलनी बँक ऑफ इंडिया समोरील मुख्य रस्त्यावर सतत रॅबिटने भरलेल्या गोण्या टाकल्या जात आहेत.बांधकामाचे कंत्राट घेणारा येथील एक स्थानिक कंत्राटदार व्यक्ती वारंवार सतत तोडकाम करण्यात आलेल्या बांधकामांच्या रॅबिटने भरलेल्या भरमसाठ गोण्या मुख्य रस्त्यावर टाकत आहे. तसेच बाजूलाच असलेल्या मोठ्या नाल्यातही हा कंत्राटदार व्यक्ती रॅबिटने भरलेल्या गोण्या टाकून देत आहे.मुख्य म्हणजे मुख्य रस्त्यावर या गोण्या टाकत असल्यामुळे याठिकाणी आता पावसाळ्यात पावसाच्या पाण्याला या गोण्या अडथळा ठरत असून यामुळे याठिकाणी कचरा साचून आजूबाजूच्या परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.यामुळे परिसरातील नागरिकांना आणि वाहनांना येण्याजाण्यास या गोण्यांमुळे अडचण निर्माण होत आहे आणि आरोग्याच्या समस्याही वाढण्याची शक्यता आहे.याबाबत याठिकाणी समोरच असलेल्या अमृत नगर मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या चौकीमध्ये येथील संबंधित चौकीचे अधिकारी यांच्याकडे याबाबत तक्रार देण्यासाठी गेल्यास ते बोलतात मी यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करू शकत नाही कारण त्या कंत्राटदार व्यक्तीचे आमच्या विभागाच्या वरिष्ठ लेव्हला हात पोहचले असून तो वरपर्यंत हप्ते देऊन अधिकाऱ्यांना मॅनेज करतो. त्यामुळे मी यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करू शकत नाही.या कंत्राटदार व्यक्तीला वरिष्ठांचा आशिर्वाद आहे असे मनपा चौकी प्रमुख यांचे म्हणणे आहे.तसेच वारंवार याबाबत तक्रार करूनही संबंधित मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाचे अधिकारी रस्त्यावर रॅबिटने भरलेल्या गोण्या टाकणाऱ्या व्यक्तीवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत नसून त्यांच्याच कृपाशीर्वादाने या व्यक्तीचे फावले आहे असे येथील स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.तसेच नागरिकांच्या समस्यांचे आणि तक्रारीचे संबंधित प्रशासनाला काहीही पडले नसल्याचे याठिकाणी दिसत आहे.







## पंढरपुरातील इस्कॉन मंदिरामध्ये बांधकामासाठी चंद्रभागेच्या पात्रातील चोरीच्या वाळूचा वापर..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर: पंढरपुरातील इस्कॉन मंदिरामध्ये बांधकामासाठी अवैधरीत्या चंद्रभागेच्या पात्रातील चोरलेली वाळू वापरताना आढळून आलेले आहे. इस्कॉन मंदिरातील घाटावर वाळू ने भरलेली पोती मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. अशी माहिती महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून दिली आहे.

भारतातील सर्वात मोठी धार्मिक संस्था म्हणून इस्कॉनची ओळख आहे. या पंढरपूर मधील इस्कॉन मंदिरात प्रशासनाचे अधिकारी त्याचबरोबर आजी-माजी मंत्रिमंडळ यांची सातत्याने भेट असते. त्यामुळे इस्कॉन मधील व्यवस्थापक या सगळ्याचा आधार घेत बांधकामासाठी चंद्रभागेच्या पात्रातील चोरीची वाळू वापरत आहे. चंद्रभागेच्या पात्रातील वाळू चोरल्यामुळे मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे कित्येक भाविकांचा जीव जात आहे. त्यामुळे पंढरपूर मधील इस्कॉन मंदिरावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी





अशी मागणी आम्ही महर्षी वाल्मिक संघाच्या वतीने करीत आहोत. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. असे गणेश अंकुशराव यांनी म्हटले आहे.

---

### ‘आधुनिक पत्रकारिता: आव्हाने आणि संधी’ कार्यशाळेत मार्गदर्शन

## डिजिटल माध्यमांमुळे पत्रकारितेची व्याप्ती वाढली : झालटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आज माहितीचा पूर आहे आणि अशा स्थितीत खरी, वस्तुनिष्ठ आणि विश्वसनीय माहिती वाचकांपर्यंत पोहोचवणे हे पत्रकारासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. डिजिटल माध्यमांमुळे पत्रकारितेची व्याप्ती वाढली असून, स्थानिक पातळीवरील बातम्यांना जागतिक व्यासपीठ मिळत आहे, असे प्रतिपादन मुंबई येथील मुंबई तकचे वरिष्ठ पत्रकार निलेश झालटे यांनी केले.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सामाजिक शास्त्र संकुल, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेतील दुसऱ्या सत्रात ते बोलत होते. सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चर्चासत्रात मुंबई तकचे वरिष्ठ पत्रकार निलेश झालटे, दै. लोकमत सोलापूरचे निवासी संपादक




मिलिंद कुलकर्णी, दै. पुढारीचे सहायक निवासी संपादक संजय पाठक , श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी नीलेश झालटे यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रातील सद्यस्थिती, बदलती आव्हाने आणि नव्याने उपलब्ध होत असलेल्या संधींवर सखोल प्रकाश टाकला.आजच्या वेगवान डिजिटल युगात पत्रकारितेचे स्वरूप कसे बदलत आहे, यावर झालटे यांनी विशेष भर दिला. यावेळी मिलिंद कुलकर्णी म्हणाले, जुनी व नवी पत्रकारिता असे भेद नसावेत. पत्रकारिता ही बोलीभाषेत केली पाहिजे. काळानुसार पत्रकारितेच्या संसाधनात बदल होतात. ते बदल पत्रकारांनी स्वीकारले पाहिजेत. स्थानिक बातम्यांना महत्त्व द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. सहाय्यक निवासी संपादक संजय पाठक म्हणाले, इशू बेस्ड पत्रकारिता गरजेचे आहे. आधुनिक पत्रकारितेत अनेक संधी असल्या तरी पत्रकारांनी अपग्रेड आणि अपडेट राहिले पाहिजे. नाविन्य पूर्ण पत्रकारिता केली पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के म्हणाले, वाचन संस्कृती अधिक विकसित करणे गरजेचे आहे. वाचन कौशल्यातून शब्दसंग्रह वाढतो. त्यातूनच प्रभावकारी बातमी लोकांपर्यंत पोहोचवता येते. काळानुसार पत्रकारांनी बदल आत्मसात केले पाहिजेत, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. विठ्ठल एडके यांनी केले.

## गोशाळेतील नवजात वासरास दुध पाजताना कर्तव्यात हलगर्जीपणा केलेल्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीची पंढरपूर शहरात नगरपरिषद हद्दीत यमाई तलावाजवळ गोशाळा आहे. या गोशाळेतील कर्मचा-याने नवजात वासरास दुध पाजताना कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याने वासराचा मृत्यू झाल्याची बातमी दि.१८ जुलै रोजी समाज माध्यमात प्रसिद्ध झाली होती. याशिवाय, त्याबाबतचा व्हिडीओ देखील समाजमाध्यमात व्हायरल झाला होता. मंदिर समितीच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले गोशाळेतील कर्मचारी योगेश सुधाकर पाठक व तानाजी रामचंद्र जाधव या दोन्ही कर्मचा-यांने २ ते ३ दिवस वयोमान असलेल्या वासरास दुध पाजताना कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याने सदर नवजात वासराचा मृत्यू झाल्याचे सस्कृतदर्शनी दिसून येत आहे. याबाबत त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने गोशाळा विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे भा.न्या.सं. २०२३ मधील कलम ३२५ व ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याशिवाय, मंदिर समितीच्या आगामी सभेत सदरचा विषय ठेवून पुढील योग्य ती कारवाई देखील नियमानुसार करण्यात येईल. यामध्ये कोणत्याही व्यक्तीस पाठीशी घातले जाणार नाही असे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

---

**पहिल्यांदाच लोकप्रतिनिधींची उपस्थितीत पांडूरंग पालखीचे पंढरपुरातून प्रस्थान** | **आमदार अभिजीत पाटील यांचा दिंडीसोबत पायी चालत नोंदवला सहभाग**

# पांडुरंग निघाले संत सावता माळींच्या भेटीला-संतपरंपरेचा अद्वितीय सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी

पांडुरंग निघाले संत सावता माळीच्या भेटीला या अभंगाप्रमाणे संत सावता माळी यांची कर्मभूमी असणाऱ्या माढा तालुक्यातील अरण या गावची आख्यायिका आहे. कामातच देव मानणाऱ्या कांदा, मुळा, भाजी आवघी विठाई माझी अशी ओळख असणाऱ्या संत सावता माळी यांच्या भेटीसाठी रविवारी कानड्या विठुरायाच्या पालखीचे अरणकडे प्रस्थान झाले. हा सोहळा अध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.





या सोहळ्याचा पहिला मुक्काम पंढरपूर ते रोपळे पर्यंत असतो यामध्ये लोकप्रतिनिधी म्हणून पहिल्यांदाच आमदार अभिजीत पाटील हे पांडुरंगाच्या पालखीसोबत आणि तमाम वारकरी भाविकांसोबत जय हरी विठ्ठल नामाचा जयघोष करत कांदा,मुळा,भाजी अवघी विठाबाई माझी म्हणत पालखीत पायी चालत सामील झाले होते.

दि.२०जुलै रोजी पंढरपूरहून संत शिरोमणी सावता माळी यांच्या अरण (ता. माढा) येथील समाधीस्थळाकडे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पांडुरंगाची पालखी प्रस्थान ठेवून तीन दिवसांच्या पायी प्रवास केल्यानंतर २६ जुलै रोजी अरण येथे पोहोचणार आहे.

दरम्यान संत सावता माळी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त पारंपरिक भक्ती, श्रद्धा आणि सेवा यांचे प्रतीक असणारा हा अनोखा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडतो. या भक्तिसोहळ्यात माढा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिजीत आबा पाटील यांनी स्वतः पायी दिंडीमध्ये रोप्ळे येथे पहिला मुक्काम असून आमदार पाटील यांनी पालखीचे स्वागत करत पायी चालत आले.

### पंढरपूर ते रोपळे पायी दिंडीत आमदार अभिजीत पाटील चालत नोंदविला सहभाग

याप्रसंगी बोलताना आ. अभिजीत आबा पाटील यांनी सांगितले की संत सावता माळी यांच्या जीवनमूल्यांचा वारसा आम्हा सर्वांच्या प्रेरणेसाठी आहे. लोकप्रतिनिधी म्हणून श्री पांडुरंग पालखीत उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. अरण या संत भूमीत पांडुरंगाची पालखी येते ही आपल्या माढा तालुक्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. पालखी सोहळ्याच्या माध्यमातून ग्रामीण भागात भक्तीचा व सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत होत आहे. हा सोहळा अधिक व्यापक करण्यासाठी पुढील वर्षांमध्ये शासनस्तरावरून आवश्यक त्या योजना राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी वारकरी संप्रदायातील अनेक मान्यवर मंडळी, कीर्तनकार, स्थानिक भक्तगण, सावता परिषद पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.